प्रेसनोट दि.05.04.2024

नारपोली पोलीस ठाणे - अन्न सुरक्षा आणि मानके

दि.04.04.2024 रोजी दुपारी 16.35 वा. चे सुमारास, नारपोली पोलीस ठाणेचे सपोनि/मोरे, पोहवा/6135 पाटील व त्यांचे पथकास मिळालेल्या माहितीवरून, श्रीराम कंम्पाउंड, बिल्डीग नं.जे-2/7 समोर, दापोडा रोड, भिवंडी येथे छापा टाकला असता, सदर ठिकाणी आरोपी अजयकुमार श्यामपाल सिंग, वय 28 वर्षे, व्यवसाय चालक, रा.खेमकरण, उत्तरप्रदेश राज्य याने टाटा कंपनीचा कंटेनर क्र.एचआर-55-डब्लूओ-326 या वाहनातुन महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला तंबाखुजन्य पदार्थ सनकी एस.एन.के.गुटका, रॉयल 1000, विवो कंपनीचा मोबाईल असा एकुण 70,30,600/- रूपये किमंतीचा माल विक्रीकरिता बेकायदेशीररित्या वाहतुक करीत असताना मिळुन आला. सदर प्रकाराबाबत सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादी वरून आरोपीविरूध्द गुन्हा रजि. नं. । 902/2024 भा.द.वि. कलम 328,188,272,273,269 सह अन्न सुरक्षा व मानके कायदा 2006 कलम 23,26(2)(iv),27,30(2)(अे) सह शिक्षा कलम 59 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपी अजयकुमार श्यामपाल सिंग, वय 28 वर्षे यास अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि/मोरे हे करीत आहे.

जन संपर्क अधिकारी,
पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर